**मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक पदावर पदोन्नतीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचा शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील अर्हताप्राप्त शिक्षकांना लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांकः-एसएसएन/२६९८/११७९२/(१४०/९८)/माशि-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १३ जून, २००५

**पहावे :-** १) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाचे पत्र क्रः- यचमुवि/कु / १२८४, दि. २.८.२०००.
२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे पत्र क्रः-मराशैसंप्रप/राशिप्रमं/शाव्यप/२००१/३६३३, दि. १५/१२/२००१.
३) शिक्षण संचालनालयाचे (माध्य. व उच्च माध्य.) पत्र क्रः-अमाशा/४१९९/३८९९४/क, दि. २ मार्च, २००२.

**प्रस्तावना :-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाने महाराष्ट्रातील माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक पदावर काम करतांना येणा-या अडचणी विचारात घेऊन अत्यंत निकडीची गरज म्हणून सन १९९४ मध्ये **शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम** हा अभ्यासक्रम सुरु केला आहे. आतापर्यंत ज्यांनी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण केला आहे त्यांना शालेय स्तरावरील दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन कुशलपणे हाताळण्यासाठी सदर अभ्यासक्रम फारच उपयुक्त ठरत असल्याचे आढळून येत आहे.

सध्याच्या नियमावलीत शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देताना विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे अननुभवी व व्यवस्थापन शास्त्राचे ज्ञान नसलेले शिक्षक मुख्याध्यापकपदी पदोन्नत झाल्याने प्रशासनावर त्यांची पकड रहात नाही, ही वस्तुस्थिती आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता पदोन्नतीपूर्वी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम हया अभ्यासक्रमाची नितांत आवश्यकता आहे. यास्तव राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांतील उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना सदर अभ्यासक्रम बंधनकारक करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-** शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावणे हे ही शासनाचे उद्दीष्ट आहे. या दृष्टिकोनातून राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च

माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना त्यांची जबाबदारी अधिक चांगल्यारीतीने पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाने तयार केलेला व त्यांच्या मार्फतच पत्रद्वारा राबविण्यात येणारा एक वर्षाचा **शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम** पूर्ण करणे बंधनकारक करण्यात येत आहे. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून नियुक्त होणा-या उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना पुढील ५ वर्षात पूर्ण करणे आवश्यक राहील. शालेय व्यवस्थापन अभ्यासक्रमाकरीता

सदर विद्यापीठातर्फे रु. १०००/- इतके शुल्क आकारण्यात येणार असून याची प्रतिपूर्ती वेतनेतर अनुदानातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

भविष्यात उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीस पात्र ठरणा-या तसेच भविष्यात सदर पदावर नियुक्त होणा-या अर्हताप्राप्त शिक्षकांना हा अभ्यासक्रम स्वखर्चाने पूर्ण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

संगणक संकेतांक —
२००९०२१२१६३२२२००१

( सु.अ.साळवे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य , पुणे
शिक्षण संचालक ( प्राथमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
अध्यक्ष ,महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ( राज्यमंडळ ) पुणे
संचालक , राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे.
शिक्षण संचालक ( प्रौढ ) , महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद
संचालक, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) जिल्हा परिषद /सर्व शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) , महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
महालेखापाल ( लेखापरीक्षा ), महाराष्ट्र १/२, मुंबई /नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व अधीक्षक , वेतनपथके ( माध्यमिक )
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
वित्त विभाग नियोजन विभाग , सामान्य प्रशासन विभाग, ग्राम विकास विभाग , मंत्रालय, मुंबई
समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.